# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर - वसई-विरार
यांचे कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व,
जि. ठाणे दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
**E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**


**प्रेस नोट :- ४२६/२०२३** **दिनांक - १२/१२/२०२३**

## विदेशी बनावटीचे ९ एमएमचे रिव्हॉल्वर विक्री करणा-या आरोपीत यास अटक करण्यास नायगाव पोलीस ठाण्यास यश.

नायगाव पोलीस ठाणे कार्यक्षेत्रात दिनांक ०८/१२/२०२३ रोजी २२:०० वाजताच्या सुमारास पो.अं. मस्ते यांना गोपनीय माहितगारामार्फत खात्रीशीर माहिती मिळाली की, एक इसम हा अग्निशस्त्र व्रिकी यमुनानगर बसस्टॉप, बापाने नायगाव पुर्व येथे करण्याकरिता बापाने येथे येणार आहे. आम्हाला मिळालेली बातमी आम्ही लागलीच पोनि सागर टिळेकर साहेब यांना कळविली असता त्यांनी रात्रगस्तीचे अधिकारी सपोनि पालकर व पोलीस स्टाफ यांना सदर बातमीची खात्री करुन कायदेशीर कारवाई करणेबाबत आदेशीत केले. त्यानुसार आरोपीत नामे राजीव बाबुराम सिंग वय-४७वर्षे व्यवसाय-चालक रा. ए गल्ली, आई चंडिकाचाळ, यमुनानगर, बापाने, नायगाव पुर्व ता वसई जि पालघर मुळ रा. ग्राम नारायणपुर, पोस्ट छकरा, पोलीस स्टेशन-केराकत तहसिल-केराकत जि जौनपूर राज्य उत्तरप्रदेश यास ताब्यात घेवुन त्यांची अंगझडतीमध्ये ०१ विदेशी बनावटीचे ९ एमएमचे रिव्हॉल्वर, मोबाईल व इतर वस्तु असा एकुण ५५,२१०/- रुपये किंमतीचा मुद्देमालासह यशस्वीरित्या सापळा रचुन ताब्यात घेतल्याने सदर आरोपीत यांच्याविरुध्द पो.अं. अझरुद्दीन मस्ते यांनी दिलेल्या तक्रारीवरुन नायगाव पोलीस ठाणे गुन्हा रजि नं ४३९/२०२३ भारतीय हत्यार कायदा कलम ३, २५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असुन सदर आरोपीत यास गुन्हयामध्ये अटक करण्यात आली आहे.

वरील कामगीरी श्रीमती पौणिमा चौगुले पोलीस उप आयुक्त, परीमंडळ - २ वसई, श्रीमती. पदमजा बडे, सहाय्यक पोलीस आयुक्त वसई विभाग, नायगाव पोलीस ठाणे वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री. रमेश भामे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री. सागर टिळेकर यांचे मार्गदर्शनाखाली स.पो.नि. बलराम पालकर, पो.हवा. लहामटे, पो.अं. अझरुद्दीन मस्ते, म.पो.अं. हर्षला दहीफळे, म.सु.ब. चव्हाण, देशमुख, आमटे, शिवगोंडे यांनी यशस्वीरित्या कामगीरी पार पाडली आहे.